सं.फौ.ख.क्र.९२/२०२४
अण्णासाहेब. वि. प्रफुल्ल

**<u>निशाणी क्र. १७ वरील जामीन अर्जावरील आदेश</u>**
**(दि.३१.०१.२०२६ रोजी पारीत)**

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपीने जामीनावर सुटका होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे असे कथन करण्यात आले की, आरोपी हा फुरसुंगी ता. हवेली, जि. पुणे येथील कायम स्वरूपी रहिवासी आहे. तो कायद्याचे पालन करणारा नागरिक आहे. त्यास शुगर व डायबिटीस आहे. त्याची सुमारे ७ ते ८ महिन्यापूर्वी सह्याद्री हॉस्पिटल, हडपसर येथे एन्जोप्लास्टी झालेली आहे. तो त्याचे वयस्कर आईसोबत राहण्यास आहे. त्याचे आईचे वय सुमारे ७३ वर्षाचे आहे. तिची देखभाल करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे. आरोपी हा मोलमजुरी करतो. तो पुढील तारखेरस हजर राहिल. असे कथन करून आरोपीला जामीनावर मुक्त करण्यात यावे अशी विनंती केली.

३. फिर्यादीतर्फे विधिज्ञांनी त्यांचे म्हणणे देवुन आरोपीला जामीनावर सोडण्यास हरकत घेतली आहे. फिर्यादीतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, आरोपीने दि. ३०.०१.२०२५ रोजी जामिन घेतला होता. त्यानंतर अनेक तारखांना प्रकरण गुन्हयाचे विवरण/प्ली निश्चित करण्याकरीता ठेवले होते. फिर्यादीने अनेकवेळा अजामिनपात्र वॉरंट काढण्यासाठी अर्ज दिले होते. परंतु, आरोपीने जाणूनबुजून अजामिनपत्र वॉरंटची बजावणी करून घेतली नाही. अर्जात कोणतेही कायदेशीर कारण नमूद नाही. असे कथन करून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. सदर प्रकरणात आरोपीस वॉरंटमध्ये न्यायालयात हजर करण्यात आले आहे. आरोपीने यापूर्वी जामिन दिल्याचे दिसत आहे. आरोपी जामीन देण्यास तयार आहे. आरोपी जामीन देत असल्यामुळे संपरीक्षेच्यावेळी त्याच्या उपस्थितीची शाश्वती राहणार आहे. फिर्यादीच्या वकीलांच्या आक्षेपांचे परिमार्जन आरोपीवर काही अटी व शर्ती लादुन करता येईल. सबब, वरील कारणांचा विचार करुन आरोपीवर काही अटी व शर्थी लादुन पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे—

# <u>आदेश</u>

१) आरोपीचा जामीन अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) आरोपीने र.रु.२५,०००/— चे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा जामीन कदबा दयावा.

३) आरोपीने पुढील नेमलेल्या तारखेस न चुकता न्यायालयात हजर राहावे.

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2026.01.31 17:15:23 +0530

स्थळः—सासवड (र.आ.सावंत)

दिनांक. ३१.०१.२०२६ *I/C* प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सासवड.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 31/01/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 31/01/2026 |
| Order Uploaded on | : | 31/01/2026 |